THANE POLICE COMMISSIONERATE

जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर
P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY
Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalawa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819028279

प्रेस नोट क्रमांक –

दिनांक– ०६/०६/२०२६

प्रेसनोट

'' खुनाच्या गुन्हयातील आरोपी वागळे क्राईम ब्रॅंच, युनिट ५, ठाणेकडुन २४ तासाच्या आत जेरबंद''

दि. ०५/०६/२०२६ रोजी वर्तकनगर पोलीस ठाण्याचे हद्दीत पोखरण रोड नं २ येथील हनुमान मंदिराजवळ, ठाणे पश्चिम येथे काही अज्ञात इसमांनी इसम नामे दिपक भुषण जैस्वार, वय २३ वर्ष, रा. गांधीनगर, ठाणे पश्चिम यास मारहाण केल्यानंतर त्याचा मृत्यु झाल्याची घटना घडली होती. सदर घटनेचा गुन्हे शाखा, वागळे युनिट - ५ कडुन समांतर तपास करीत असताना मिळालेल्या गुप्त बातमी वरून सदर गुन्हयात आरोपी नामे १) अजय देवकीलाल गिरी, वय २८ वर्ष, रा. कटकुईया, पो. वंशापुर्वा, ता. हल्दी, जि. बहराईच, उत्तर प्रदेश २) शिवा संजय गोस्वामी, वय २५ वर्ष, रा. नारायणपुर कला, पो. कटकुईया, ता. नानपुरा, जि. बहराईच, उत्तर प्रदेश यांना प्राथमिक तपासामध्ये निष्पन्न करण्यात आले.

सदर आरोपींच्या संबंधाने करण्यात आलेल्या तांत्रीक विश्लेषणावरून सदर आरोपी हे पनवेल रेल्वे स्टेशन वरून गोरखपुर एक्सप्रेस मधून पळून जात असल्याची खात्रीलायक माहिती प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने व.पो. निरी/सलील भोसले यांनी घटक -५ वागळे कार्यालयाकडील मसपोनिरी पल्लवी ढगेपाटील, श्रेणीपोउपनि सुनिल अहिरे तसेच सपोउपनि राजेंद्र चौधरी, पो.ना/७१५९ तेजस ठाणेकर, पो.कॉ/८०३३ मिनीनाथ शिकारे यांना आरोपींचा तात्काळ शोध घेवून त्यांना ताब्यात घेण्याकामी रवाना केले होते.

त्याअनुसार सदर पथकाने रेल्वेमधून सदर आरोपींचा गुप्त पध्दतीने पाठलाग करून आरोपी नामे १) अजय देवकीलाल गिरी, वय २८ वर्ष, रा. कटकुईया, पो. वंशापुर्वा, ता. हल्दी, जि. बहराईच, उत्तर प्रदेश २) शिवा संजय गोस्वामी, वय २५ वर्ष, रा. नारायणपुर कला, पो. कटकुईया, ता. नानपुरा, जि. बहराईच, उत्तर प्रदेश व त्यांचे सोबत १३ संशयित इसमांना कसारा रेल्वे स्टेशन येथे १८.४५ वा. ताब्यात घेतले . सदर गुन्हयाचा पुढील तपास वर्तकनगर पो. स्टे कडुन करण्यात येत आहे.

सदरची कारवाई श्री. डॉ. पंजाबराव उगले, पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री. पराग मणेरे, पोलीस उप आयुक्त आर्थिक गुन्हे शाखा, श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली श्री.शेखर बागडे, सहायक पोलीस आयुक्त शोध १ गुन्हे, श्री. सलील भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा घटक ५ वागळे ठाणे, मसपोनिरी पल्लवी ढगेपाटील, श्रेणीपोउपनि सुनिल अहिरे तसेच सपोउपनि राजेंद्र चौधरी, पो.ना/७१५९ तेजस ठाणेकर, पो.कॉ/८०३३ मिनीनाथ शिकारे या पथकाने केली आहे.

————०००००————